# खराडे ॲग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: पहिला || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि: ०१ फेब्रुवारी, २०२४

## ‘कृषिक-२०२४’ सारख्या देशव्यापी कृषी प्रदर्शनात खराडे ॲग्रोचा विशेष सहभाग!




**टीम खराडे ॲग्रो : कृषीक २०२४ येथे.**

### कृषी जगतातील विशेष घडामोडी

- देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारमन १ फेब्रुवारीला अंतरिम अर्थसंकल्प सादर करतील. दरम्यान २०२४ च्या अंतरिम अर्थसंकल्पात अर्थ मंत्रालयाने १८ कोटींहून अधिक रक्कम कृषी कर्ज म्हणून वितरित केली आहे.
- ‘शेतीचे विज्ञान नव्याने समजून घेवून सेंद्रिय आणि विषमुक्त शेतीच करावी’; देवेंद्र फडणवीस यांचे शेतकऱ्यांना आवाहन.
- कृषी स्टार्टअप एक्स्पोची ७ वी आवृत्ती "उत्तीष्ठ २०२४" मध्ये स्टार्टअप्सना एकूण १४.६ कोटी वितरित करण्यात आले आहेत.
- कृषी क्षेत्राचा विजेचा वापर मागील दहा वर्षात ३७.१ टक्क्यांवर झाला आहे. हे एका आव्हालाच्या माध्यामतून समोर आले आहे.

१ फेब्रु: जानेवारी महिन्यात "कृषिक-२०२४" या देशव्यापी कृषिप्रदर्शना पासून ते इंदापूर येथे झालेल्या भव्य कृषिप्रदर्शना पर्यंत कृषिक्षेत्रात होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये खराडे ॲग्रोने विशेष सहभाग दर्शविला आहे.



**पिक नोंदणी-वहीचे वाटप.**

### नववर्षाचे स्वागत, सहस्त्र नोंद-वह्यांचे वाटप:

२०२४ ची सुरुवात करत असताना खराडे ॲग्रोने सहस्त्र "पिक नोंदणी वही-२०२४" चे मोफत वाटप केले. या उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या जीवनातील शेती संदर्भातील विविध तपशील जतन करता येणार आहेत. या नोंद वही मध्ये असलेल्या माहितीचा वापर केल्याने शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांना तोंड फुटणार आहे तसेच या वहीचा वापर केल्याने शेतकऱ्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळेल असा आशावाद देखील खराडे ॲग्रोच्या संस्थापक मंडळाने केला.



Plot no. 251, M.I.D.C. Baramati || 9309253091 || 9209317742

# आयटी' नाही तर आपली 'शेती'च बरी म्हणत तरुणाने केला आगळावेगळा स्टार्ट-अप!



मधु करगुंड

देशभरातील अनेक इंजीनियर युवक उत्तम आईटी जॉब मिळवण्यासाठी बैंगलोरला जातात. पण कर्नाटकातील तीस वर्षीय मधु करगुंडने मात्र आपला बैंगलोर मधील आयटी जॉब सोडून शेती व शेतकऱ्यांसाठी काहीतरी करायचे ठरवले. वडील स्वतः शेतकरी असल्यामुळे शेती विषयी त्याला आधीपासून आत्मीयता होती. पण शेतकऱ्यांचे होणारे नुकसान त्याला बघवत नव्हते!
त्याने 'टेनजीन' नावाच्या स्टार्टअपची सुरुवात केली. टेनजीनमध्ये नारळाच्या प्रत्येक अंगापासून वेगवेगळ्या गोष्टींचे उत्पादन केले जाते. टेनजीनच्या साह्याने कुठल्याही मध्यस्थ्या शिवाय शेतकऱ्यांना त्यांचा माल विकता यावा व आपल्या हक्काचा पैसा मिळवता यावा, अशी तजवीज मधू करगुंडने केली आहे. त्याच्या या व्यवसायात त्याने महिलांच्या बचत गटांना सुद्धा समाविष्ट केले आहे. आज मधुकर गुंड महिन्याला लाखांमध्ये पैसे कमवतो आणि यासोबतच अनेक शेतकऱ्यांचे शुभाशीर्वाद देखील मिळवतो.

२०१८ मध्ये ३० वर्षीय मधू करगुंड यांनी नोकरी सोडत असल्याची घोषणा केली. मुळचा कर्नाटकी असलेला हा तरुण आठ वर्षांपासून आयटीमध्ये काम करत होता, त्यामुळे या निर्णयाने त्यांच्या कुटुंबीयांना आश्चर्याचा धक्का बसला होता. पण कालांतराने त्यांचे ही मत परिवर्तन झाले.

"मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे, वारंवार येणारे अपयश, कमी नफा आणि हवामानातील बदल यामुळे शेतकऱ्यांना कसे त्रास सहन करावे लागते हे मी पाहिले आहे. मी त्यांना त्यांच्या नारळांचा अत्याधिक नफा मिळविण्यात मदत करण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या या स्टार्टअपमुळे, मी व्यवसाय (शेती) अधिक फायदेशीर बनवण्याची आणि तरुणांना पुढे जाण्याचे आशा दाखू शकतो."
मधु करगुंडच्या या कार्याला खराडे ॲग्रोचा मानाचा सलाम!

## || बोल अनुभवाचे ||

### श्री.गणपत भानुदास भोंग, (शेतकरी-इंदापूर)

कृषी उत्पन्न बाजार समिती, इंदापूर या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या 'आदर्श उच्च प्रतिचे पेरू उत्पादक' या सन्मानाचा मी मानकरी ठरलो, या बद्दल मी समाधानी आहे. कोणत्याही फळाची बाग असो किंवा पीक असो, शेतकरी त्याचे फार मनापासून काळजी घेतो. असं असताना प्रत्येक पिकाच्या अडचणी व समस्या वेगवेगळ्या आहेत.

जेव्हा आपण पेरू सारख्या फळ-पिकाचा विचार करतो तेव्हा अती उष्णता, तीव्र ऊन, फळमाशी इत्यादि. घटक प्रचंड त्रास दायक असतात. या अडचणी इतकं नुकसान करू शकतात की तुमच्या फळांचा दर्जा एकदम खालावतो.
पेरू पिकाबद्दल बोलत असताना किंबहुना पेरूचा दर्जा जास्तीत जास्त उच्च प्रतीचा कसा राखता येईल यावर बोलत असताना मला नक्कीच एक गोष्ट सांगावीशी वाटते की तुम्हाला फ्रुटनेट व अँटी फोग बॅग चा वापर करावा लागेल. मग तुम्हाला प्रश्न पडला असेल की फ्रुटनेट कुठून मागवायचे आणि याबद्दल अधिक माहिती कोण देईल. तर, मी आवर्जून सांगेल की तुम्ही खराडे ॲग्रो, बारामती यांच्याशी संपर्क साधा. त्यांचे फ्रुटनेट, अँटी फोग बॅग तसेच खराडे ॲग्रोची सेवा तात्परता अतिशय उत्तम आहे.

### श्री. किशोर अंधारे, (कृषी-अधिकारी, बार्शी)

माझ्या शेतात सीताफळ, पेरू, आंबा इत्यादी. बागा आहेत. आज फळ बागांबद्दल बोलत असताना मला फार मनापासून वाटतं की शेतकऱ्यांनी आता शेतीकडे उदरनिर्वाहचं साधन म्हणून न पाहता व्यवसाय म्हणून पाहिलं पाहिजेत. आणि त्यासाठी किमान फळबागांची लागवड झाली पाहिजेत. कृषी अधिकारी म्हणून काम करत असताना मी स्वतः शनिवार-रविवारी शेती करतो. फळ बागा पिकवताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अनिवार्य झाले आहे.

उदाहरण द्यायचे झालेच तर पेरूची बाग पिकवत असताना फ्रुटनेट चा वापर अनिवार्य आहे. पूर्वी ही पद्धत न्हवती, आजही अनेक लोकांना या बद्दल माहिती नाही! पण याबद्दलचे ज्ञान लोकांपर्यंत पोहचवून शेतकऱ्यांच्या जीवनाला नवी दिशा देणारे काही लोक/संस्था आहेत. त्यापैकी एक म्हणजे- बारामतीचे, खराडे ॲग्रो!
एक ॲग्रो कंपनी म्हणून काम करत असताना त्यांनी फक्त त्यांचा 'प्रॉडक्ट' नाही विकला तर खर्याथनि कृषी जीवनाशी निगडीत, लोकसंखेचे प्रबोधन केले.
मी स्वतः त्यांचे फ्रुटनेट वापरत असून त्यांचा माल व सेवा दोनही विशेष उल्लेखनीय आहे.